THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 7TH DECEMBER 1893.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख ११ माहे जुलई सन १८९३.

नंबर ५०१८.—सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट ह्याच्या ८ व्या व ११ व्या कलमांअन्वयें ज्या कानू करून रकान्यांत निर्दिष्ट केलेल्या जाहिरनाम्यांमध्यें प्रसिद्ध केल्या आहेत, त्या कानूंमध्यें फेरफार करण्यासाठीं आणि त्यांस पुरवणीदाखल अशा सदर्हू कलमाखालच्या खालीं दिलेल्या कानू गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांनीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची आधीं मंजुरी घेऊन, केल्या आहेत.

नंबर २७४३ व २७४३ अ, तारीख २२ एप्रिल सन १८९०, सन १८९० चें मुंबई सरकारी गझेट, भाग १, ह्याच्या ३४१–३४८ ह्या पृष्ठांवर प्रसिद्ध केलेले.

#### कलम ८ ह्याअन्वयें कानू.

१. सदर्हू आक्टाच्या ८ व्या कलमाअन्वयें करून जाहिरनामा नंबर २७४३, तारीख २२ माहे एप्रिल सन १८९०, ह्यांत प्रसिद्ध केलेल्या कानूंपैकीं २ ऱ्या कानूच्या (५) रकमेंत खालीं दिलेला मजकूर जास्त दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें :—

"आणि 'मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम' ह्या संज्ञेचा अर्थ, ३०० ग्यालनांच्या अगर त्यापेक्षां मोठ्या अशा कोणत्याही पात्रांत असलेलें पिट्रोलियम, असा आहे."

२. सदर्हू कानूंपैकीं १८ व्या कानूंत खालीं दिलेला मजकूर जास्त दाखल करावा : तो मजकूर येणेंप्रमाणें :—

"(२) पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें आंत आणिलेलें असेल तेव्हां, तें, सूर्योदय व सूर्यास्त ह्यांच्या दरम्यान, एकादा नळ अगर घडींव लोखंडाची एकादी नळी लावून तारवांतून किनाऱ्यावर एकदम घ्यावें, किंवा मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल कलम ११ अन्वयें केलेल्या कानूंपैकीं ६ (५) (ब) ह्या कानूवरहुकूम योग्य रीतीनें दाखला दिलेल्या मचव्यांत घालून आणावें. ह्याप्रमाणें आणिलेलें पिट्रोलियम सहज नेतां येण्याजोग्या टांक्यांत अगर तशा पात्रांत नसलें तर तें पंप लावून सांठवणाच्या टांक्यांमध्यें भरावें, आणि त्या तारवांतून अगर दाखलेवाल्या मच-

ज्यांतून पिट्रोलियम काढून घेण्याचें काम पुरें झालें ह्मणजे, तें ज्या नळ्या लावून काढिलें असेल, त्या नळ्या, किनाऱ्यावर ठेवलेल्या एका जादा पंपाच्या योगानें ताबडतोब रिकाम्या कराव्या. त्या तारवांतलें अगर दाखलेवाल्या मचव्यांतलें पिट्रोलियम काढून घेण्याचें काम सूर्यास्तापर्यंत पुरें झालें नाहीं तर, तें काढण्याच्या नळींत जें पिट्रोलियम राहील तें सुटून जाऊं नये ह्मणून एकाद्या वाल्वाच्या योगानें बंदोबस्त करावा."

३. सदहू कानूंपैकीं २२व्या कानूच्या ऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें:—

"२२. तारवावरील पिट्रोलियमापैकीं प्रत्येक निशाणीच्या अगर प्रतीच्या पिट्रोलियमांतून नमुने घ्यावयाचे ते खालीं दिलेल्या प्रमाणानें घेतले पाहिजेत :—

(१) दाखल्याचें पिट्रोलियम.

| | |
|---|---|
| (अ) पेट्यांत असलेलें. | दर १९,००० पेट्यांस अगर त्यांहून कमी पेट्यांस, एक नमुना. |
| (ब) (१) मोठ्या प्रमाणाचें अगर टांक्यांत असलेलें अगर<br>(२) पिपांत असून एकाच प्रतीचें असल्याबद्दल इकरार केलेलें. | दर १,२०,००० ग्यालनांस अगर त्यांहून कमी ग्यालनांस एक नमुना; मग तें पिट्रोलियम एकाच खणांत अगर टांक्यांत असो किंवा एकाच निशाणीचें अगर प्रतीचें एकच कन्सैन्मेंट असून अनेक खणांत, टांक्यांत अगर पिपांत घातलेलें असो. |

(२).—बिन-दाखल्याचें पिट्रोलियम.

| | |
|---|---|
| (अ) पेट्यांत असलेलें. | दर १०,००० पेट्यांस अगर त्यांहून कमी पेट्यांस, एक नमुना. |
| (ब) (१) मोठ्या प्रमाणाचें अगर टांक्यांत असलेलें.<br>(२) पिपांत असून एकाच प्रतीचें असल्याबद्दल इकरार केलेलें. | दर ८०,००० ग्यालनांस अगर त्यांहून कमी ग्यालनांस एक नमुना; मग तें पिट्रोलियम एकाच खणांत अगर टांक्यांत असो, किंवा एकाच निशाणीचें अगर प्रतीचें एकच कन्सैन्मेंट असून अनेक खणांत, टांक्यांत अगर पिपांत घातलेलें असो. |

४. सदहू कानूंपैकीं २९ व्या कानूच्या दुसऱ्या पारिग्राफाच्या आरंभीं "येणेंप्रमाणें कळविण्यांत आल्यानंतर" असे जे शब्द आहेत, त्यांच्या ऐवजीं, "त्या कन्सैन्मेंटांतील पिट्रोलियम पेट्यांत भरलेलें असेल तेव्हां" हे शब्द दाखल करावे.

त्या पारिग्राफांत खालीं दिलेला मजकूर जास्त दाखल करावा :—

"तें कन्सैन्मेंट मोठ्या प्रमाणानें आणिलेलें पिट्रोलियम असेल तेव्हां, आणखी तपासणी करणें जरूर आहे असें तपासणी-अमलदारास वाटल्यास, कस्टम्सच्या मुख्य अमलदारानें, मूळ नमुना ज्या टांक्यांतून घेण्यांत आलेला होता त्यांतलें पिट्रोलियम योग्यरीतीनें ढवळल्यानंतर त्यांतला एक दुसरा नमुना घेऊन तो त्या तपासणी-अमलदाराकडे पाठविला पाहिजे, आणि त्या तपासणी-अमलदाराचा जादा रिपोर्ट येई तोंपर्यंत त्या टांक्यांतल्या पिट्रोलियमचा कोणताही भाग जमिनीवर उतरूं देतां कामा नये. त्या दुसऱ्या नमुन्याबद्दलचा रिपोर्ट त्या पिट्रोलियमसंबंधानें असमाधानकारक झाला तर, कस्टम्सच्या मुख्य अमलदारानें त्या टांक्यांतील सगळें पिट्रोलियम भयकारक पिट्रोलियम समजून त्याप्रमाणें तजवीज करावी."

### कलम ११ ह्याअन्वयें कानू.

१. सदर्हू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें करून जाहिरनामा नंबर २७४३ अ. तारीख २२ माहे एप्रिल सन १८९०, ह्यांत प्रसिद्ध केलेल्या कानूंपैकीं १ल्या कानूंत खालीं दिलेला मजकूर जास्त दाखल करावाः तो मजकूर येणेंप्रमाणें :—

"(४) मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम ह्या संज्ञेचा अर्थ, ३०० ग्यालनांच्या अगर त्याहून मोठ्या अशा कोणत्याही पात्रांत असलेलें पिट्रोलियम, असा आहे."

२. सदर्हू ११व्या कलमाअन्वयें केलेल्या सदर्हू कानूंपैकीं ३ ऱ्या कानूंत, (ब) रकमेच्या नंतर आणि तिच्या विशेष ठरावाच्या आधीं, खालीं दिलेला मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें :—

(अ) सदर्हू कानूंमध्यें कोणताही ठराव असला तरी, स्थानिक सरकार, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें आणि आपण घालून दिलेल्या शर्ती लागू करून, आपण पसंत केलेल्या प्लानांबरहुकुम आणि स्पेसिफिकेशन्सबरहुकुम मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम सांठविण्यासाठीं मुद्दाम तयार केलेल्या जागेमध्यें कोणत्याही विवक्षित परिमाणाचें पिट्रोलियम कबजांत ठेवण्यासाठीं परवाना देण्यास मुखत्यार आहे. अशा जागेंतील प्रत्येक सांठवणीच्या टांक्यावर अगर इतर पात्रावर, त्यांत किती ग्यालन पिट्रोलियम मावण्याजोगें आहे तें, सहज दिसेल अशा रीतीनें लिहिलेलें असलें पाहिजे.

(ब) मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम सांठविण्यासाठीं मुंबई बंदराच्या ट्रस्टींमध्यें निविष्ट असलेल्या अगर ते ट्रस्टी धारण करीत असलेल्या जमिनीवर त्या ट्रस्टींच्या लेखी संमतीनें आणि स्थानिक सरकारानें पसंत केलेल्या प्लानांबरहुकुम व स्पेसिफिकेशन्सबरहुकुम जें कोणतेंही टांकें अगर पात्र बांधण्यांत येईल, तें ह्या कानूंअन्वयें पिट्रोलियम कबजांत ठेवण्याबद्दल परवाना दिलेली जागा आहे असें समजलें पाहिजे.

(क) मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम ज्या धक्क्यांवर उतरावयाचें असेल ते धक्के जलमार्गाच्या कस्टम्सच्या आक्टाअन्वयें, मुंबई सरकारी गॅझेटांत, भयकारक नाहीं असें पिट्रोलियम उतरण्याचे धक्के ह्मणून जाहीर केले पाहिजेत.

३. सदर्हू ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या सदर्हू कानूंपैकीं ६ व्या कानूच्या ऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावाः तो मजकूर येणेंप्रमाणें :—

"६. (१) भयकारक पिट्रोलियम मोठ्याप्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याची अगदीं मनाई आहे. *भयकारक पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याची मनाई आहे.*

(२) कोणतेंही भयकारक पिट्रोलियम विशेष परवान्याशिवाय एका जागेहून दुसऱ्या जागीं नेतां कामा नये. *भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याकरितां विशेष परवाना जरूर आहे.*

(३) ५०० ग्यालनपेक्षां जास्त असलेलें भयकारक नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल साधारण अगर विशेष परवाने देण्याचा अखत्यार आहे. *भयकारक नाहीं असें पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल साधारण व विशेष परवाने.*

(४) मोठ्या प्रमाणाचें नाहीं असे पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल तेव्हां, त्याबद्दल परवाने द्यावयाचे ते, तें पिट्रोलियम जर हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर लवकर न फुटणाऱ्या अशा इतर पात्रांमध्यें भरलेलें *मोठ्या प्रमाणाचें नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल परवाने.*

असेल अगर चांगल्या बूच मारलेल्या आणि फुटण्याची भीति नाहीं अशा रीतीनें काळजीपूर्वक प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असेल, तर मात्र देण्यांत येतील.

पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल परवाने.

(५) भयकारक नाहीं असें पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असल्यास त्याबद्दलचे परवाने खालील नियमांस अनुसरून देण्याचा अख्त्यार आहेः

(अ) तें रेल्वेनें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना देण्याचा अख्त्यार आहे; तें ज्या रेल्वे आड्मिनिस्ट्रेशनाच्या लैनीवरून न्यावयाचें असेल त्या रेल्वे आड्मिनिस्ट्रेशनानें पसंत केलेल्या अशा टांक्याच्या वागणींत अगर सहज नेतां येण्याजोग्या टांक्यांत तें भरलेलें असेल तर.

(ब) तें आगबोटींतून अगर मचव्यांतून एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना देण्याचा अख्त्यार आहे; तें ज्या आगबोटींतून अगर मचव्यांतून न्यावयाचें असेल, ती आगबोट अगर तो मचवा त्या कामासाठीं योग्य असल्याबद्दल ह्या बाबतींत स्थानिक सरकारानें नेमिलेल्या अमलदाराकडून दाखला मिळालेला असेल तर.

(क) तें गाड्यांतून एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना देण्याचा अख्त्यार आहे; तें ज्या गाड्यांतून न्यावयाचें असेल त्या गाड्या त्या कामासाठीं योग्य असल्याबद्दल ह्या बाबतींत स्थानिक सरकारानें नेमिलेल्या अमलदाराकडून दाखला मिळालेला असेल तर.

पिट्रोलियमपासून उत्पन्न झालेला वायू काढून टाकण्याबद्दल व्यवस्था.

मात्र, तें पिट्रोलियम ज्या टांक्यांत सांठविलेलें असेल, अगर ज्या रेल्वे वागणींतून, आगबोटींतून, मचव्यांतून अगर गाड्यांतून मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल त्यांत पिट्रोलियमपासून उत्पन्न झालेला वायु न राहूं देण्याबद्दल सरकारास पसंत पडेल अशी तजवीज केलेली असली पाहिजे.

साधारण परवाने.

(६) (अ) भयकारक नाहीं असें पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें रेल्वेनें, रस्त्यानें अगर जलमार्गानें एका जागेहून दुसऱ्याजागीं नेण्याबद्दलचे आणि मोठ्या प्रमाणाचें नाहीं असें पिट्रोलियम गाड्यांतून मात्र एका जागेहून दुसऱ्याजागीं नेण्याबद्दलचे बारा महिन्यांच्या मुदतीचे साधारण परवाने देण्याचा अख्त्यार आहे. अशा परवान्यांमध्यें, त्याच्या धारण करणारांना, खरोखर त्यांचें स्वतःचें पिट्रोलियम, न्यावयाच्या स्थलासंबंधानें अगर परिमाणासंबंधानें निर्बंध ठेविल्याशिवाय, एका जागेहून दुसऱ्याजागीं नेण्याचा अधिकार दिलेला असेल.

पास.

(ब) साधारण परवाना धारण करणारानें, त्या परवान्याअन्वयें न्यावयाच्या पिट्रोलियमाच्या प्रत्येक कन्सैन्मेंटाबरोबर, ह्या कानूंस जोडलेल्या ग नमुन्याबरहुकुम एक पास दिला पाहिजे; त्या पासामध्यें, तें पिट्रोलियम कोणत्या जागेपासून कोणत्या जागीं न्यावयाचें तें आणि तो पास किती पिट्रोलियमबद्दल आहे तें सांगितलेलें पाहिजे. अशा प्रत्येक पासावर नंबर असला पाहिजे, आणि साधारण परवान्याचा नंबर, पिट्रोलियम नेणाऱ्या गाडीवरील शेवटल्या पेटीच्या सर्वांस दिसणाऱ्या अशा भागावर अगर सर्वांस दिसेल अशा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें ठळक आंकड्यांनीं मांडिला पाहिजे.

विशेष परवाने किती मुदतींपर्यंत अमलांत राहातील.

(७) पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचे विशेष परवाने, ते देण्याच्या तारिखेपासून साहा महिन्यांपेक्षां जास्त नाहीं अशी जी मुदत सरकार अगर ते परवाने देणारा अमलदार ठरवील त्या मुदतीपर्यंत अमलांत राहातील: मात्र, कोणताही योग्य अमलदार त्या मुदतीच्या आंत जर तो परवाना रद्द करील तर त्या प्रसंगास सदर्हू ठराव लागू होणार नाहीं.

(८) पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या प्रत्येक विशेष परवान्यामध्यें, तें पिट्रोलियम कोणत्या जागेहून कोणत्याजागीं न्यावयाचें तें, तो परवाना किती पिट्रोलियमबद्दल आहे तें, आणि तो परवाना किती मुदतीपर्यंत चालावयाचा तें नमूद केलेलें असलें पाहिजे. आणि त्यांत काय असलें पाहिजे.

४. सदर्हू ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या सदर्हू कानूंपैकीं १२व्या कानूंतला, "एक वर्षपर्यंत अमलांत राहील" ह्या शब्दांनंतरचा सगळा मजकूर रद्द केला आहे.

५. सदर्हू कानूंपैकीं १४ व्या कानूंत खालीं दिलेला मजकूर जास्त दाखल करावा : तो मजकुर येणेंप्रमाणें :—

"(७) पिट्रोलियम रेलवेनें, रस्त्यानें अगर जलमार्गानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा बारा महिन्यांचा साधारण परवाना ... रु. १००

६. हल्लीं चालू असलेले नमुने अ, ब, क, व ड ह्यांच्या ऐवजीं खालील परिशिष्टांत दिलेले नमुने दाखल करावे.

---

# परिशिष्ट.

## नमुना अ.

**भयकारक पिट्रोलियम कबजांत ठेवण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६चा आक्ट १२ वा) ह्याच्या ९ व्या अगर ६ व्या कलमाअन्वयें द्यावयाचा परवाना.**

नंबर

फी रुपये

ह्यावरून ह्यास ग्यालन भयकारक पिट्रोलियम ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस व शर्तींस अनुसरून खालीं वर्णन केलेल्या जागीं सांठविण्यास परवाना दिला आहे.

हा परवाना ह्याच्या तारिखेपासून एक वर्षपर्यंत अमलांत राहील; आणि हा पुनः नवीन करून द्यावा ह्मणून सदर्हू वर्ष संपण्यापूर्वीं निदान पंधरा दिवस अर्ज करण्यांत आला ह्मणजे तो पुनः नवीन करून देण्याचा अखत्यार आहे.

सदरीं उल्लेख केलेल्या जागेचें वर्णन :—

(सही)

सेक्रेटरी निसबत मुंबई सरकार.

पिट्रोलियम चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त नसेल तेव्हां.
अगर, म्युनिसिपल कमिशनर, मुंबई.
अगर, रेसिडेंट, एडन.
अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

### अ नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

कानू.

[ येथें सदर्हू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू १ ते ९ (दोन्ही धरून) आणि १६ह्या दाखल कराव्या.]

शर्तीं.

हा परवाना खालील शर्तींस पात्र ठेवून दिला आहे :—

१. हा परवाना ज्या जागेच्या संबंधानें दिला आहे, त्या जागेंत ज्वालाग्राही पदार्थ मुळींच सांठवूं नयेत.

२. सदर्हू पिट्रोलियमच्या प्रत्येक पेटीवर ( अगर डबा वगैरे ह्यावर ) सदर्हू आक्टाच्या ७ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें नांवाचीं चिठ्ठी असली पाहिजे.

३. ज्या इमारतींत सदर्हू पिट्रोलियम सांठविलेलें असेल, त्या इमारतीच्या आंत पिट्रोलियम भरलेलें कोणतेंही पात्र उघडूं नये आणि कोणत्याही पात्रांतून तेल काढूं नये.

४. त्या इमारतीच्या आंत कोणत्याही वेळीं कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये.

५. सरकार किंवा हा परवाना देणारा अमलदार जर, हा परवाना ज्या जागेबद्दल दिलेला असेल त्या जागेच्या सुरक्षितपणासाठीं सरकारच्या अगर त्या अमलदाराच्या मतें जरूर असलेल्या कोणत्याही मरामती करण्यास परवाना धारण करणारास लेखी नोटीस देऊन हुकूम करील, तर, त्या परवाना धारण करणारानें त्या नोटिशींत सांगितलेल्या मुदतीच्या आंत ( ही मुदत ती नोटीस पोंचल्याच्या तारिखेपासून एका आठवड्यापेक्षां कमी नसावी ) त्या मरामती केल्या पाहिजेत.

६. हा परवाना धारण करणारानें, ह्या परवान्यांत दाखल केलेल्या पिट्रोलियमांतून तीन ग्यालन पेक्षां जास्त पिट्रोलियम, सदर्हू आक्टाच्या ५ व्या किंवा ६ व्या कलमाअन्वयें तितकें पिट्रोलियम कबजांत ठेवण्यास ज्या मनुष्यास परवाना मिळालेला नसेल, त्या कोणत्याही मनुष्याच्या स्वाधीन करूं नये. त्याला जर त्यांतून तीन ग्यालनांपेक्षां जास्त नाहीं इतकें पिट्रोलियम कोणत्याही मनुष्याच्या स्वाधीन करावयाचें असलें, तर त्यानें सदर्हू आक्टाच्या ६ व्या कलमाच्या विशेष ठरावांत असें पिट्रोलियम ज्या पात्रांत घालावयाचें त्या पात्राच्या संबंधानें जे ठराव आहेत, त्यांस अनुसरून वागलें पाहिजे.

---

## नमुना ब.

**भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा आक्ट १२ वा ) ह्याच्या ५ व्या अगर ६ व्या कलमाअन्वयें द्यावयाचा विशेष परवाना.**

नंबर फी रुपये

ह्यावरून राहणार ह्यास, सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट कलम ह्याअन्वयें, एकंदर ग्यालन भयकारक पिट्रोलियम भरलेल्या पेट्या ( किंवा डबे वगैरे, जसें असेल तसें,) ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस व शर्तींस अनुसरून खालीं निर्दिष्ट केलेल्या मार्गानें येथून येथें पाठविण्यास परवाना दिला आहे : तो मार्ग येणेंप्रमाणें :—

प्रत्येक पेटींत ( किंवा डबा वगैरे ह्यांत ) पिट्रोलियम किती आहे तें खालीं नमूद केलें आहे :—

हा परवाना तारीख माहे सन १८९ पर्यंत मात्र अमलांत राहील.

(सही.)

सेक्रेटरी निसबत सरकार.

पिट्रोलियम चाळीस ग्यालनांपेक्षां अधिक नसेल तेव्हां.
- अगर, मुंबईचे पोलीस कमिशनर किंवा डेप्युटी कमिशनर.
- अगर, रेसिडेंट, एडन.
- अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

---

### ब नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

### कानू.

[ येथें सदर्हू आक्टाच्या ११ व्या कलमाखालीं केलेल्या कानूंपैकीं कानू १, २, ६ आणि १६ ह्या दाखल कराव्या]

## शर्ती.

हा परवाना खालील शर्तींस पात्र ठेवून दिला आहे :—

१. सदर्हू पिट्रोलियम सदर्हू आक्टाच्या ७ व्या कलमाबरहुकूम नांवाच्या चिठ्या मारलेल्या पात्रांमध्यें असलें पाहिजे.

२. सदर्हू पिट्रोलियम ( येथें वाहानाचा प्रकार दाखल करावा ) नें नेलें पाहिजे.

३. सदर्हू पिट्रोलियम आगबोटीनें नेण्यांत येईल तेव्हां, तें, परवाना देणारा अमलदार अगर ह्या बाबतींत तो ज्या दुसऱ्या कोणत्याही अमलदाराला लेखी हुकूम करून नेमील तो अमलदार त्या आगबोटीचा जो भाग पसंत करील त्या भागांत त्यानें पसंत केलेल्या रीतीनें सांठविलें पाहिजे.

४. सदर्हू पिट्रोलियम रेल्वेनें नेण्यांत येईल तेव्हां, तें ज्या लैनीवरून अगर लैनींवरून न्यावयाचें असेल, त्या लैनीचे अगर लैनींचे रेलवे अधिकारी वेळोवेळीं त्यासंबंधानें ज्या सामान्य अगर विशेष कानू करितील त्या सर्व कानूंस तें पात्र राहील.

५. सदर्हू पिट्रोलियम होडीनें नेण्यांत येत असेल तेव्हां, ती होडी जोंपर्यंत एडनधरून सगळ्या मुंबई इलाक्यांतील कोणत्याही बंदराच्या हद्दींच्या आंत असेल तोंपर्यंत तीवर कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये. शिवाय, तें पिट्रोलियम ज्या होडींत असेल त्या होडीवर, तिच्या मागच्या भागीं, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत, अठरा इंच लांब व बारा इंच रुंद असा एक तांबडा बावटा लावलेला असला पाहिजे आणि त्यावर “ Petroleum Boat ”[ पिट्रोलियम बोट ] हे शब्द काळ्या अक्षरांनीं लिहिलेले असले पाहिजेत.

६. सदर्हू पिट्रोलियम गाडीनें नेण्यांत येत असेल तेव्हां ज्या गाडींत तें असेल ती गाडी सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयापूर्वीं चालवूं नये व तिच्यावर दिवा मुळींच असूं नये.

७. ज्या मनुष्याजवळ सदर्हू आक्टाच्या ९ व्या अगर ६ व्या कलमाखालीं दिलेला परवाना नसेल, त्या मनुष्याच्या स्वाधीन ३ ग्यालनपेक्षां जास्त पिट्रोलियम करण्याची हा परवाना धारण करणारास मनाई आहे; आणि त्यापेक्षां कमी पिट्रोलियम स्वाधीन करणें तें, तें पिट्रोलियम कोणत्या प्रकारच्या पात्रांत ठेविलें पाहिजे त्याबद्दल सदर्हू आक्टाच्या ६ व्या कलमाच्या विशेष ठरावांत ज्या अटी सांगितल्या आहेत, त्या पुऱ्या करण्यांत आल्याशिवाय स्वाधीन करूं नये.

---

## नमुना क.

**भयकारक नाहीं असें पिट्रोलियम कबजांत ठेवण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा १२ वा ) ह्याच्या १० व्या कलमाअन्वयें द्यावयाचा परवाना.**

नंबर फी रुपये

ह्यावरून ह्यास भयकारक पिट्रोलियम नाहीं असें ग्यालन पिट्रोलियम खालीं वर्णन केलेल्या जागेंत ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस आणि शर्तींस अनुसरून ठेवण्याचा परवाना दिला आहे.

हा परवाना तारीख माहे सन १८९ पर्यंत मात्र अमलांत राहील.

सदरीं उल्लेख केलेल्या जागेचें वर्णन :—

(सही)

म्युनिसिपल कमिशनर, मुंबई.

अगर, रेसिडेंट, एडन.

अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

तारीख माह सन १८९ .

## क नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

### कानू.

[ येथें सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट, कलम ११, ह्याखालीं केलेल्या कानू १ ते ९, (दोन्ही धरून) आणि १६ ह्या दाखल कराव्या.]

### शर्ती.

हा परवाना खालील शर्तीस पात्र ठेवून दिला आहे :—

१. हा परवाना ज्या जागेसंबंधानें दिला आहे, त्या जागेंत ज्वालाग्राही पदार्थ मुळींच सांठवूं नयेत.

२. ज्या इमारतींत सदर्हू पिट्रोलियम सांठविलेलें असेल, त्या इमारतीच्या आंत पिट्रोलियम भरलेलें कोणतेंही पात्र उघडूं नये आणि कोणत्याही पात्रांतून तेल काढूं नये.

३. त्या इमारतीच्या आंत कोणत्याही वेळीं कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये.

४. परवाना देणारा अमलदार जर, हा परवाना ज्या जागेबद्दल दिलेला असेल त्या जागेच्या सुरक्षितपणासाठीं आपल्या मतें जरूर असलेल्या कोणत्याही मरामती करण्यास परवाना धारण करणारास लेखी नोटीस देऊन हुकूम करील, तर, त्या परवाना धारण करणारानें त्या नोटिशींत सांगितलेल्या मुदतीच्या आंत ( ही मुदत ती नोटीस पोंचण्याच्या तारिखेपासून एका आठवड्यापेक्षां कमी नसावी) त्या मरामती केल्या पाहिजेत.

---

## नमुना ड.

### भयकारक नाहीं असें पिट्रोलियम थोड्या प्रमाणानें कबजांत ठेवण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट ( सन १८८६ चा १२ वा) ह्याच्या १० व्या कलमाअन्वयें द्यावयाचा परवाना.

नंबर फी रुपये

ह्यावरून ह्यास, ग्यालन पिट्रोलियम खालीं वर्णन केलेल्या जागेंत, ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस आणि शर्तीस अनुसरून सांठवण्याचा परवाना दिला आहे.

सदरीं उल्लेख केलेल्या जागेचें वर्णन :—

म्युनिसिपल कमिशनर, मुंबई.
अगर, रेसिडेंट, एडन.
अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

तारीख माहे सन १८९ .

---

## ड नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

### कानू.

[ येथें सदर्हू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं १ ते ९ (दोन्ही धरून) व १६ ह्या कानू दाखल कराव्या.]

### शर्ती.

[येथें, ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ३ अ ह्या कानूबरहुकूम स्थानिक सरकारानें प्लान व स्पेसिफिकेशन्सबद्दल ज्या शर्ती घातलेल्या असतील, त्या दाखल कराव्या].

---

## नमुना ई.

### भयकारक नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा १२ वा) ह्याच्या १० व्या कलमाअन्वयें द्यावयाचा विशेष परवाना.

नंबर . फी रुपये

ह्यावरून ह्यास पेट्या

*मिळून ग्यालन पिट्रोलियम येथून

येथें, ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस आणि शर्तीस अनुसरून नेण्याचा परवाना दिला आहे.

हा परवाना तारीख माहे सन १८९ पर्यंत अमलांत राहील.

तारीख माहे सन १८९ .

मुंबईचे पोलिस कमिशनर अगर डेप्युटी कमिशनर.
अगर, रेसिडेंट, एडन.
अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

---

### ई नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

### कानू.

[येथें, सदरहू आक्टाच्या ११व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू १, २, ६ आणि १६ ह्या दाखल कराव्या.]

### शर्ती.

हा परवाना खालीं दिलेल्या शर्तीस पात्र ठेवून दिला आहे:—

#### सदरहू पिट्रोलियम आगबोटीनें नेण्यांत येईल तेव्हां.

१. तें पिट्रोलियम, परवाना देणारा अमलदार अगर ह्या बाबतींत तो ज्या दुसऱ्या कोणत्याही अमलदाराला लेखी हुकूम करून नेमील तो अमलदार त्या आगबोटीचा जो भाग पसंत करील त्या भागांत, त्यानें पसंत केलेल्या रीतीनें सांठविलें पाहिजे.

#### सदरहू पिट्रोलियम होडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

२. तें पिट्रोलियम ज्या होडीनें नेण्यांत येत असेल, त्या होडीवर कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये, अगर विस्तव पेटवूं देऊं नये.

३. शिवाय, तें पिट्रोलियम नेणाऱ्या होडीवर, तिच्या मागच्या बाजूस, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत, अठरा इंच लांब व बारा इंच रुंद असा एक तांबडा बावटा लाविला असला पाहिजे आणि त्यावर "Petroleum Boat" [पिट्रोलियम बोट] हे शब्द काळ्या अक्षरांनीं लिहिले असले पाहिजेत.

#### सदरहू पिट्रोलियम गाडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

४. तें पिट्रोलियम ज्या गाडीनें नेण्यांत येत असेल, ती गाडी सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयापूर्वीं चालवूं नये आणि तिच्यावर दिवा मुळींच असूं नये.

#### सदरहू पिट्रोलियम रेलवेनें नेण्यांत येईल तेव्हां.

५. तें पिट्रोलियम ज्या लैनीवरून अगर लैनींवरून न्यावयाचें असेल, त्या लैनीचे अगर लैनींचे रेलवे अधिकारी वेळोवेळीं त्यासंबंधानें ज्या सामान्य अगर विशेष कानू करितील त्या सर्व कानूंस तें पात्र राहील.

---

* पिट्रोलियम मोठ्याप्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल तेव्हां "पेट्या मिळून" हे शब्द गाळावे.

६. हा परवाना मोठ्या प्रमाणाच्या पिट्रोलियमबद्दल दिलेला असेल तेव्हां, सदहू तेल ज्या आगबोटीनें, मचव्यानें, गाडीनें अगर रेल्वे वागणीनें न्यावयाचें असेल त्या आगबोटीबद्दल, मचव्याबद्दल, गाडीबद्दल अगर रेल्वेवागणीबद्दल कलम ११ अन्वयें केलेल्या कानूंपैकीं ६व्या कानूंत ठराव असल्याप्रमाणें योग्य रीतीचा दाखला असला पाहिजे. मोठ्याप्रमाणाचें नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल हा परवाना देण्यांत येईल तेव्हां, तें पिट्रोलियम, सदरील ६व्या कानूंत सांगितल्याप्रमाणें, हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर लवकर फुटणार नाहींत अशा इतर पात्रामध्यें भरलेलें असलें पाहिजे अगर चांगल्या बूच मारिलेल्या आणि फुटण्याची भिति नाहीं अशा रीतीनें काळजीपूर्वक प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असलें पाहिजे.

**साधारण शर्त.**

७. हा परवाना त्यावर निर्दिष्ट केलेल्या मार्गासंबंधानें मात्र कायदेशीर समजला जाईल, आणि तो, तें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या कामीं ज्या रेल्वेचा अगर वाहून नेण्याचें काम करण्याच्या ज्या इतर मंडळीचा अगर मनुष्याचा उपयोग केलेला असेल, तिजकडे अगर त्याकडे हजर केला पाहिजे; आणि ज्या मुदतीपर्यंत तो कायदेशीर असेल ती मुदत संपतांच, तो, परवाना देणाऱ्या अधिकाऱ्याकडे परत दिला पाहिजे.

---

## नमुना फ.

**भयकारक नाहीं असें पिट्रोलियम गाडीनें (अगर मोठ्या प्रमाणानें, जसें असेल तसें,) एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा १२ वा), कलम १०, ह्याअन्वयें द्यावयाचा साधारण परवाना.**

कानू ६ (अ) पाहा.

नंबर

फी रुपये १००

ह्यावरून ह्यास भयकारक नाहीं असें पिट्रोलियम (गाडीनें, अगर मोठ्या प्रमाणानें, जसें असेल * तसें,] ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानू व शर्ती ह्यांस अनुसरून मुंबई इलाक्यांत एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा साधारण परवाना दिला आहे.

हा परवाना तारीख माहे सन १८९ पावेतों अमलांत राहील.

तारीख माहे सन १८९ . { मुंबईचे पोलीस कमिशनर अगर डेप्युटी कमिशनर.<br>अगर, रेसिडेंट एडन.<br>अगर, जिल्हा माजिस्ट्रेट. }

---

**फ नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.**

**कानू.**

[येथें सदहू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू १, २, ६, आणि १६ ह्या दाखल कराव्या.]

**शर्ती.**

**सदहू पिट्रोलियम आगबोटीनें नेण्यांत येईल तेव्हां.**

१. तें पिट्रोलियम, परवाना देणारा अमलदार अगर ह्या बाबतींत तो ज्या दुसऱ्या कोणत्याही अमलदाराला लेखी हुकूम करून नेमील तो अमलदार त्या आगबोटीचा जो भाग पसंत करील त्या भागांत, त्यानें पसंत केलेल्या रीतीनें सांठविलें पाहिजे.

* पिट्रोलियम मोठ्याप्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल तर तें कोणत्या रीतीनें न्यावयाचें तें निर्दिष्ट करावें.

### सदर्हू पिट्रोलियम होडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

२. तें पिट्रोलियम ज्या होडीनें नेण्यांत येत असेल, त्या होडीवर कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये.

३. तें पिट्रोलियम नेणाऱ्या होडीवर, तिच्या मागच्या भागीं, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत, अठरा इंच लांब व बारा इंच रुंद असा एक तांबडा बावटा लावलेला असला पाहिजे; आणि त्यावर "Petroleum Boat" [ पिट्रोलियम बोट ] हे शब्द काळ्या अक्षरांनीं लिहिलेले असले पाहिजेत.

### सदर्हू पिट्रोलियम गाडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

४. तें पिट्रोलियम ज्या गाडीनें नेण्यांत येत असेल, ती गाडी सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयाच्या आधीं चालवूं नये व तिच्यावर दिवा मुळींच असूं नये.

### सदर्हू पिट्रोलियम रेलवेनें नेण्यांत येईल तेव्हां.

५. तें पिट्रोलियम ज्या लैनीवरून अगर लैनींवरून न्यावयाचें असेल, त्या लैनीचे अगर लैनींचे रेलवे अधिकारी वेळोवेळीं त्यासंबंधानें ज्या सामान्य अगर विशेष कानू करितील त्या सर्व कानूंस तें पात्र राहील.

६. परवान्याचा नंबर गाडीवरील शेवटल्या पेटीच्या सर्वांस दिसणाऱ्या भागावर अगर सर्वांस दिसे अशा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें ठळक आंकड्यांनीं मांडिला पाहिजे.

### साधारण शर्त.

७. हा परवाना मोठ्या परिमाणाच्या पिट्रोलियमबद्दल देण्यांत आला असेल तेव्हां, तें तेल ज्या आगबोटींतून, मचव्यांतून, गाडींतून अगर रेलवे वागणींतून एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल, त्या आगबोटीबद्दल, मचव्याबद्दल, गाडीबद्दल, अगर रेलवे वागणीबद्दल, ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ६व्या कानूंत ठराव असल्याप्रमाणें योग्य रीतीचा दाखला असला पाहिजे.

मोठ्या प्रमाणाचें नाहीं अशा पिट्रोलियमबद्दल हा परवाना देण्यांत येईल तेव्हां, तें पिट्रोलियम, सदरील ६ व्या कानूंत सांगितल्याप्रमाणें, हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर लवकर न फुटणाऱ्या अशा इतर पात्रांमध्यें भरलेलें असलें पाहिजे, अगर चांगल्या बूच मारलेल्या व फुटण्याची भीति नाहीं अशा रीतीनें काळजीपूर्वक प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असलें पाहिजे.

---

## नमुना ग.

### भयकारक पिट्रोलियम नाहीं असें पिट्रोलियम गाडीनें ( अगर, मोठ्या प्रमाणानें, जसें असेल तसें,) एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल साधारण परवाना नंबर धारण करणारानें द्यावयाचा पास.

नंबर

ह्याच्या खऱ्या मालकीचें *पेट्या मिळून ग्यालन पिट्रोलियम

देऊन येथें नेण्यांत येईपर्यंत त्याबद्दल हा पास चालेल.

साधारण परवाना नंबर धारण करणारा.

---

### ग नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

### सदर्हू पिट्रोलियम आगबोटीनें नेण्यांत येईल तेव्हां.

१. तें पिट्रोलियम, परवाना देणारा अमलदार अगर ह्या बाबतींत तो ज्या कोणत्याही दुसऱ्या अमलदाराला लेखी हुकूम करून नेमील तो अमलदार त्या आगबोटीचा जो भाग पसंत करील, त्या भागांत, त्यानें पसंत केलेल्या रीतीनें सांठविलें पाहिजे.

---

*पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल तेव्हां " पेट्या मिळून" हे शब्द गाळावे.

### सदर्हू पिट्रोलियम होडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

२. तें पिट्रोलियम ज्या होडीनें नेण्यांत येत असेल, त्या होडीवर कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये. तें पिट्रोलियम नेणाऱ्या होडीवर, तिच्या मागच्या भागीं, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत, अठरा इंच लांब व बारा इंच रुंद असा एक तांबडा बावटा लावलेला असला पाहिजे, आणि त्यावर "Petroleum Boat" [ पिट्रोलियम बोट ] हे शब्द काळ्या अक्षरांनीं लिहिलेले असले पाहिजेत.

### सदर्हू पिट्रोलियम गाडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

३. तें पिट्रोलियम ज्या गाडीनें नेण्यांत येत असेल, ती गाडी सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयापूर्वीं चालवूं नये व तिच्यावर दिवा मुळींच असूं नये.

### सदर्हू पिट्रोलियम रेलवेनें नेण्यांत येईल तेव्हां.

४. तें पिट्रोलियम ज्या लैनीवरून अगर लैनींवरून न्यावयाचें असेल, त्या लैनीचे अगर लैनींचे रेलवे अधिकारी वेळोवेळीं त्यासंबंधानें ज्या सामान्य अगर विशेष कानू करितील, त्या सर्व कानूंस तें पात्र राहील.

### साधारण शर्ती.

५. सदर्हू पिट्रोलियम ज्या साधारण परवान्यावरहुकुम नेण्यांत येत असेल, त्या साधारण परवान्याचा नंबर, गाडीवरील शेवटच्या पेटीच्या सर्वांस दिसणाऱ्या भागावर अगर सर्वांस दिसे अशा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें ठळक आंकड्यांनीं मांडिला पाहिजे.

६. हा परवाना मोठ्या प्रमाणाच्या पिट्रोलियमबद्दल देण्यांत आला असेल तेव्हां, तें तेल ज्या आगबोटींतून, मचव्यांतून, गाडींतून अगर रेलवे वागणींतून एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल, त्या आगबोटीबद्दल, मचव्याबद्दल, गाडीबद्दल अगर रेलवे वागणीबद्दल, ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ६ व्या कानूंत ठराव असल्याप्रमाणें योग्य दाखला असला पाहिजे. मोठ्या प्रमाणाचें नाहीं अशा पिट्रोलियमाबद्दल हा परवाना देण्यांत येईल तेव्हां, तें पिट्रोलियम, सदरील ६ व्या कानूंत सांगितल्याप्रमाणें हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर लवकर न फुटणाऱ्या अशा इतर पात्रांमध्यें भरलेलें असलें पाहिजे, अगर चांगल्या बूच मारलेल्या व फुटणार नाहींत अशा रीतीनें काळजीपूर्वक प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असलें पाहिजे.

आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर
इन् कौन्सिल ह्यांच्या हुकुमावरून,
(सही) जी. डब्ल्यू. व्हायडल,
आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.